राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक संवर्गातील अधिकाऱ्याला निरीक्षक (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीनंतर देण्यात येणाऱ्या पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक:- इएसटी-१७१७/प्र.क्र.१२१/भाग-१/राउशु-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३० मे, २०१८.

शासन आदेश -

राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक (गट-क) या संवर्गातून निरीक्षक (गट-ब) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१७-१८ च्या पदोन्नतीसूचीमधील खालील अधिकाऱ्यांना निरीक्षक (गट-ब) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत असून सदर पदोन्नतीनंतर, त्यांची त्यांच्या नावासमोर (स्तंभ ४ येथे) दर्शविण्यात आलेल्या महसूली विभागामध्ये (स्तंभ ५ येथे) दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदोन्नती समावेशनाचा प्रवर्ग	वाटप करण्यात आलेला महसूली संवर्ग	पदोन्नतीनंतर देण्यात येणारी पदस्थापना	शेरा
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**
१	श्री. लक्ष्मण बाळू माळी	खुला	पुणे	भरारी पथक, सातारा	रिक्त पदी

सदर पदोन्नती ही, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधीन राहून राहून देण्यात येत आहे. सदर तात्पुरत्या स्वरूपातील पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यास नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

सदर अधिकाऱ्यांनी पदोन्नतीचा स्वीकार करून, पदोन्नतीच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे. सदर अधिकाऱ्यांनी सदर पदोन्नतीचा स्वीकार करून, पदोन्नतीच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे. संबंधित अधिकाऱ्यांना नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास त्वरीत कळवावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५३०१४०१२६३३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2018.05.30 14:04:05 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई व नागपूर.
३) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४) जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती/ सातारा.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती/सातारा.
६) संबंधित अधिकारी.
७) निवडनस्ती-(राउशु-१).